# नेमके निवडून घ्या ज्ञान

## स्वाध्याय


### अ. आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**





उत्तर: १. संघर्षाला २. हातातला दिवस

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




उत्तर: १. विकीपीडिया २. असांजे
३. विकीलिक्स्

**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**




उत्तर: १. नाचरेपणा
२. तरुण, उत्साही व शक्तिशाली उन्माद

**कृ.४. चौकट पूर्ण करा.**

१. **नेट-इंटरनेटच्या मुखातील विश्वदर्शन असे आहे** → [ ]

२. **ही मुलांची फ्रेण्ड झाली आहे** → [ ]

**उत्तर:** १. मायावी २. माहितीची मोहिनी

**कृ.५. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. ________ हे 'नेमके निवडून घ्या ज्ञान' या कवितेचे कवी आहेत.

(लघू कानडे / लहू रानडे / लहू कानडे / लवू कानडे)

२. 'नेमके निवडून घ्या ज्ञान' ही कविता ________ या काव्यसंग्रहातली आहे.

(तळ शोधताना / तळ ढवळताना / तळे ढवळताना / तळ खोदताना)

३. तुम्ही ________ होण्याचे कोणतेच कारण नाही.

(कंपित / भयकंपित / चकित / अपमानित)

४. माहित्यय मला ________ तुमच्यातील अन् तरुण उत्साही उन्मादही शक्तिशाली.

(विचित्रपणा / मूर्खपणाा / उन्मादपणा / नाचरेपणा)

उत्तर: १. लहू कानडे २. तळ ढवळताना

३. भयकंपित ४. नाचरेपणा

**कृ.६. खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. जे ज्ञान कष्टाने कमवावे लागते ते ________

अ. नेमके समजून घ्या.

ब. नेमके शोधून घ्या.

क. नेमके आत्मसात करा.

ड. नेमके निवडून घ्या.

२. मुलांनो लढत राहा, कारण ________

अ. संघर्षाला पर्याय नाही.

ब. संघर्षाला मरण नाही.

क. संघर्ष अमर्त्य आहे.

ड. संघर्ष चुकविता येत नाही.

उत्तर: १. जे ज्ञान कष्टाने कमवावे लागते ते **नेमके निवडून घ्या.**

२. मुलांनो लढत राहा, कारण **संघर्षाला मरण नाही.**

**कृ.७. सत्य विधान शोधून लिहा.**

माहितीच्या जंजाळात आपल्याला नेमके हवे ते ज्ञान निवडावे लागते कारण –

अ. प्रचंड माहितीचा स्रोत आपली दिशाभूल करू शकतो.

ब. माहिती सातासमुद्रापार सापडते.

क. संघर्षाला मरण असते.

ड. आपण भयकंपित होतो.

**उत्तर:** प्रचंड माहितीचा स्रोत आपली दिशाभूल करू शकतो.

**कृ.८. असत्य विधान शोधून लिहा.**

कवीला विद्यार्थ्यांमध्ये हे गुण जाणवले –

अ. नखरेलपणा

ब. नाचरेपणा

क. तारुण्य

ड. उत्साही व शक्तिशाली उन्माद

**उत्तर:** नखरेलपणा

**कृ.९. कवितेवर आधारित प्रश्न**

**१. 'दिवा सांभाळा हातातील राहा लढत' या काव्यपंक्तीचे विचारसौंदर्य स्पष्ट करा.**

**उत्तर:** 'तळ ढवळताना' या कवी लहू कानडे यांच्या काव्यसंग्रहातील 'नेमके निवडून घ्या ज्ञान' या कवितेतील ही काव्यपंक्ती आहे. आजच्या जीवघेण्या स्पर्धेत विद्यार्थ्यांसमोर अनेक प्रकारची प्रलोभने येत असतात. माहितीच्या महाजालातून वाटचाल करताना विद्यार्थी संभ्रमात पडतात, नेमके कोणते ज्ञान घ्यावे हे त्यांना समजत नाही. अशा वेळी मुलांनी भयभीत न होता ज्ञानाचा दिवा तेवत ठेवावा व लढत राहावे, संघर्ष करत राहावे असा संदेश कवी देत आहेत.

**२. 'नेमके निवडून घ्या ज्ञान जे कमवावे लागते कष्टाने!' या काव्यपंक्तीतून कवी काय सांगू इच्छितो?**

**उत्तर:** कवी लहू कानडे यांच्या 'तळ ढवळताना' या कवितासंग्रहातून घेतलेल्या 'नेमके निवडून घ्या ज्ञान' या कवितेत कवी विद्यार्थ्यांना माहितीच्या स्फोटामध्ये वाहवत न जाता, स्वत:ला उपयुक्त असे ज्ञान तेवढे निवडून घ्या असे सांगत आहेत. कवी म्हणतात, माहितीशी तुमची पक्की मैत्री झाली आहे. ह्या माहितीच्या भुलभुलैयातून जर तुम्हाला सहीसलामत बाहेर पडायचे असेल, तर सद्सद्विवेकबुद्धीने नेमके योग्य ज्ञान जाणून घ्यावे. इंटरनेटचे हे महाभयंकर रूप मायावी, फसवे आहे. आपल्या विवेकबुद्धीने नेमके ते ज्ञान निवडून घ्या. हे सहजच मिळणारे नाही, ह्यासाठी कष्ट करा. विवेकशील वृत्तीने, कष्टाने मिळविलेले ज्ञान आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक आहे.

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. [ ] : भयमुक्त : : मरण : जन्म

२. मायावी : जादुई : : [ ] : समजणे

**उत्तर:** १. भयकंपित २. उमजणे

**कृ.२. खालील शब्दांचे समानार्थी व विरुद्धार्थी शब्द लिहून कोष्टक पूर्ण करा.**

| | समानार्थी | शब्द | विरुद्धार्थी |
|---|---|---|---|
| १. | | तरुण | |
| २. | | उत्साह | |
| ३. | | शक्तिशाली | |

**उत्तर:**

| | समानार्थी | शब्द | विरुद्धार्थी |
|---|---|---|---|
| १. | युवा | तरुण | वृद्ध |
| २. | चैतन्य | उत्साह | निरुत्साह |
| ३. | बलवान | शक्तिशाली | दुबळा |

**कृ.३. खालील शब्दांना पर्यायी शब्द लिहा.**

| कष्ट | संघर्ष | उन्माद | दिवा | मुख | मोहिनी |
|---|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

**उत्तर:** १. श्रम  २. लढा

३. जोश  ४. दीप

५. चेहरा  ६. भुरळ

**कृ.४. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. कष्ट, लढा, संघर्ष, समुद्र

२. उत्साह, उन्माद, मोहिनी, नाचरेपणा

**उत्तर:** १. समुद्र  २. मोहिनी

**कृ.५. कंसात दिलेले वाक्प्रचार खाली दिलेल्या वाक्यांत योग्य त्या ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

**(उन्माद होणे, संघर्ष करणे, भयकंपित होणे)**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढा दिला.

२. समोर फणा काढून बसलेला नाग बघताच पंढरी खूप घाबरला.

३. पैशासाठी वणवण करणाऱ्या राजीवला वडिलोपार्जित संपत्तीचा वारसा हक्क मिळाल्यामुळे माज आला.

उत्तर: १. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या हक्कांसाठी आयुष्यभर **संघर्ष केला**.

२. समोर फणा काढून बसलेला नाग बघताच पंढरी **भयकंपित झाला**.

३. पैशासाठी वणवण करणाऱ्या राजीवला वडिलोपार्जित संपत्तीचा वारसा हक्क मिळाल्यामुळे **उन्माद झाला**.

**कृ.६. खाली दिलेल्या शब्दांपासून तीन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | भय : | | | |
| २. | शक्ती : | | | |

उत्तर: १. भयमुक्त, भयभीत, भयकंपित

२. शक्तिशाली, शक्तिप्रदर्शन, शक्तिवान

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. दिलेल्या विशेष्यांना कवितेत वापरलेली विशेषणे लिहा.**

१. उन्माद २. विश्वदर्शन

**उत्तर:** १. शक्तिशाली २. मायावी

**कृ.२. खालील शब्द व विभक्ती यांच्या जोड्या जुळवा.**

| | शब्द | | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | लेकरांनो | अ. | पंचमी |
| २. | संघर्षाला | ब. | षष्ठी |
| ३. | माहितीची | क. | संबोधन |
| | | ड. | चतुर्थी |

**उत्तर:** (१ - क), (२ - ड), (३ - ब)

**कृ.३. वाक्यातील अव्यय ओळखून त्याचा प्रकार लिहा.**

'विकीपीडिया विकीलिक्स् असांजे अन् काय काय'

**उत्तर:** अन् – उभयान्वयी अव्यय

**कृ.४. वाक्यातील अधोरेखित अव्यये ओळखा.**

'आणि आता तर काय बुवा तुमी पोचलात साता समुद्रापार'

**उत्तर:** आता – क्रियाविशेषण अव्यय

बुवा – केवलप्रयोगी अव्यय

समुद्रापार – शब्दयोगी अव्यय

**कृ.५. दिलेल्या अलंकाराचे कवितेतून उदाहरण शोधून लिहा.**

'चेतनगुणोक्ती' अलंकाराचे लक्षण सांगून कवितेतील उदाहरणे शोधून लिहा.

**उत्तर:** **लक्षण** : जेव्हा निर्जीवावर सजीवाचे किंवा मानवी गुण आरोपित केले जातात तेव्हा चेतनगुणोक्ती अलंकार होतो.

**उदा:** १. 'संघर्षाला मरण नाही'
संघर्ष या निर्जीव बाबीवर मरण हे मानवी वैशिष्ट्य आरोपित केले आहे.

२. 'माहितीची मोहिनीच तुमची फ्रेण्ड झालीये'
मोहिनी या निर्जीव बाबीवर फ्रेण्ड म्हणजेच मैत्री होणे हा मानवी गुण आरोपित केला आहे.

३. 'नेट-इंटरनेटच्या मुखातील विश्वदर्शन मायावी'
इंटरनेट या निर्जीवावर मुख हे सजीवाचे वैशिष्ट्य आरोपित केले आहे.

**कृ.६. 'नेमके निवडून घ्या ज्ञान' या कवितेचा छंद ओळखा.**

अ. अभंग    ब. मुक्तछंद

क. ओवी

**उत्तर:** ब. मुक्तछंद

**कृ.७. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

लेकरांनो, तुम्ही भयकंपित होण्याचे आता कारण नाही.

**उत्तर:** **लेकरा**, **तू** भयकंपित होण्याचे आता कारण नाही.

**कृ.८. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. सन्घर्ष / संघर्ष / संघर्श / संर्घश

२. भयकंपीत / भयकपिंत / भयंकपीत / भयकंपित

३. उन्माद / उम्नाद / उन्नमाद / उन्मात

४. विष्वदर्शन / विश्वर्दशन / विश्वदर्शन / वीश्वदर्शन

उत्तर: १. संघर्ष २. भयकंपित

३. उन्माद ४. विश्वदर्शन

## ड. माझे मत

**कृ.१. या कवितेत कवी मुलांना कोणती शिकवण देत आहेत असे तुम्हाला वाटते?**

उत्तर: लहू कानडे यांनी 'नेमके निवडून घ्या ज्ञान' या कवितेत युवा पिढीने, विद्यार्थ्यांनी नेमके अचूक ज्ञान कसे निवडून घ्यावे, खरे ज्ञान प्राप्त करण्यासाठी कोणत्या गोष्टी आत्मसात कराव्यात याचे मार्गदर्शन केले आहे.

कवी विद्यार्थ्यांना म्हणतात, 'या आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या जगात तुम्ही भयकंपित न होता हातातील ज्ञानाचा दिवा सांभाळा, लढत राहा, संघर्ष करत राहा. (खरे) ज्ञान प्राप्त करण्यासाठी सतत संघर्ष करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही; परंतु ज्ञान मिळविण्याचा मार्ग मात्र डोळसपणे निवडा. तुमचा

अतिउत्साह मला माहीत आहे आणि त्याचबरोबर तुमचा उतावीळपणा, नाचरेपणा माहीत आहे. त्यामुळेच सातासमुद्रापलीकडची माहिती गोळा करताना माहितीच्या मोहक युगात नाहक बळी न पडता, ह्या भुलभुलैयाच्या नेट-इंटरनेटच्या या विश्वदर्शनातून नेमकेपणाने ज्ञान निवडण्यास शिका. ज्ञान हे कष्टाने, संघर्षानेच कमवावे लागते म्हणून सद्सद्विवेकाने ज्ञान संपादन करा.

**कृ.२. इंटरनेटच्या वापरातील धोके व बलस्थानं यांची चर्चा करा.**

**उत्तर:** इंटरनेटमुळे जग जवळ आले आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे जणू माहितीचा विस्फोटच झाला आहे. कोणत्याही विषयाची माहिती आता एका क्लिकने मिळते. भारतात बसून जगाच्या कानाकोपऱ्यांतील माणसांशी संपर्क साधता येतो. त्यांचे जगणे, प्रश्न, श्रद्धा समजून घेता येतात. यामुळे जीवनाचा दर्जा उंचावतो, सभोवतालाचे भान वाढते; पण याचसोबत इंटरनेटचे अनेक धोकेही आहेत. अनेक दहशतवादी, समाजकंटक इंटरनेटचा एक शस्त्र म्हणून वापर करतात. त्यामुळे अशा संकेतस्थळांवर जाणे टाळावे. तसेच लैंगिकतेविषयी चुकीची माहिती देणारी संकेतस्थळेही बोकाळली असून त्यापासूनही दूर राहावे. इंटरनेट हे ज्ञानार्जनाचे उत्तम साधन असून त्यापासून अधिकाधिक ज्ञान ग्रहण करावे.